# अग्रेसर महाराष्ट्रात निर्यातभिमुख लघुउद्योगांना भरपूर संधी

**प्रा. दीपक ताटपुजे**

खुल्या अर्थव्यवस्थेमुळे जागतिक बाजारपेठेची कवाडे उद्योगांना खुली झाली आहेत. बाजारपेठेतील तीव्र स्पर्धेमुळे गुणवत्ताजन्य उत्पादनांना मागणीही वाढली. आपल्या देशातून निर्यात होणाऱ्या मालामध्ये लघुउद्योगांचा वाटा लक्षणीय आहे. तसेच तो सातत्याने वाढतही आहे. विशिष्ठ उत्पादने निर्माण करून निर्यात करणाऱ्या लघुउद्योगांची संख्याही महाराष्ट्रात, अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. याच परिस्थितीचा आढावा घेणारा हा लेख.....

शासनाने आयात-निर्यात धोरणात केलेल्या अनेक बदलांमध्ये प्रामुख्याने लघुउद्योगांमधुन निर्माण होणारी उत्पादने आणि निर्यात यांच्या राखीव उत्पादन प्रमाणात ७५ टक्यावर ५० टक्के हा बदल मोठ्या उद्योगांना खुला केला आहे. त्याचप्रमाणे लघुउद्योगांची यंत्रसामुग्री गुंतवणुक मर्यादा ६० लाखांहून ३ कोटी एवढी वाढवली आहे. या दोन धोरणांचा एकत्रित परिणाम म्हणून निर्यातीवर असणारी बंधने अधिक शिथील होऊन निर्यात वाढ होण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्याचप्रमाणे काही विशिष्ठ उत्पादने ही लघुउद्योगांसाठी निर्यातीकरीता राखीव ठेवण्यात आली आहेत. वरील उल्लेखित दोन धोरणांचा परिणाम जसा बाजारपेठेत तीव्र स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता करतो. तसेच लघुउद्योगांसाठी राखीव निर्यात उत्पादने हे धोरण अधिक समक्ष-निर्यात होण्यास उपयुक्त ठरणार आहे.

उद्योगांचे विकेंद्रीकरण, रोजगार-निर्मिती, अविकसित भागांना विकासासाठी प्रोत्साहन ही त्रिसुत्री घेऊन देशाच्या अर्थकारणात महत्वाची भूमिका बजावणारा लघुउद्योग या स्पर्धेत गुणवत्तेच्या आधारेच वाढणार आहे. औद्योगिकीकरण आणि नवीन उद्योगांची उभारणी ही लघुउद्योगांना यापुढील काळात विकासासाठी पुरक ठरणार आहे. आपल्या राज्यात १९९५ ते १९९७ या दोन वर्षाच्या काळात एकूण १६९ महत्वाचे मोठे उद्योग प्रकल्प उभे राहिले असून या उद्योगांमधील एकूण गुंतवणूक १०३३३ कोटी रूपयांहून अधिक आहे. याचाच अर्थ अग्रेसर महाराष्ट्रात पूरक-लघुउद्योगांना विकासासाठी आवश्यक पायाभूत आणि बाजारपेठ-जन्य उद्योजकीय वातावरणाची वाढ होत आहे.

निर्यातभिमुख उद्योगांची संख्या महाराष्ट्रात, ओरीसा, तामिळनाडू, मध्यप्रदेश, गुजराथ, कर्नाटक, प. बंगाल, राजस्थान या राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजेच ४५६ एवढी वाढ १९९१ ते १९९७ या सहा वर्षाच्या काळात झाली आहे. आपल्या राज्यातील ४५६ निर्यातभिमुख उद्योगांमधील एकूण गुंतवणुक ६३०७ कोटी एवढी आहे. (आलेख क्र. १ पहावा) आपल्या राज्यातील या निर्यातभिमुख उद्योगांची वाढलेली संख्या पाहता 'महाराष्ट्र' या राज्यात कॉम्प्यूटर सॉफ्टवेअर, फळांची-फुलांची निर्यात, खाद्य-प्रक्रिया उद्योग, दागिने, कापड, कपडे निर्मिती, चामडी चप्पल, पर्स आदी उद्योग. केमिकल आणि अन्य अभियांत्रिकी उत्पादनांची निर्यात ही सर्वाधिक होत आहे. गेल्या पाच वर्षातील या उल्लेखीत सर्व उद्योगांच्या उत्पादन-निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

आपल्या देशातून होणाऱ्या या उद्योगांमधील एकूण निर्यातीचे प्रमाण हे जागतिक बाजारपेठेच्या तुलनेत ही सातत्याने गेल्या सहा वर्षात वाढत असल्याने अग्रेसर महाराष्ट्रात या उद्योगांमध्ये निर्यातीसाठी संधी उपलब्ध आहेत. या निर्यातजन्य उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत आणि अन्य सुविधाही आपल्या राज्यात उपलब्ध असल्यानेच अन्य राज्यांच्या तुलनेत निर्यातभिमुख उद्योगांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

आपल्या देशातून एकूण निर्याती पैकी २९.६९% एवढा सहभाग लघुउद्योगांचा इ.स. १९९१ साली होता. त्यामध्ये सातत्याने वाढ होऊन १९९७ सालीा हाच सहभाग ३६.२ टक्के एवढा झाला आहे. (आलेख क्र. २ पहावा) लघुउद्योगांची ही कामगिरी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये यामुळेच महत्वाची ठरते आहे. नोंदणी लघुउद्योजकांना निर्यातीसाठी देण्यात येणारा विशिष्ठ दर्जा (स्पेशल स्टेटस् टू स्मॉल स्केल इंडस्ट्री एक्स्पोर्टस) हा या उद्योग वाढीसाठीही महत्वपूर्ण कामगिरी बजावत आहे.

महाराष्ट्र सरकारने निर्यात वाढीसाठी स्थापन केलेला खास ''व्यापार आणि वाणिज्य विभाग'', जागतिक व्यापार केंद्र, एम्. विश्वैश्वरैया औद्योगिक संशोधन आणि विकास केंद्र, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद आदी संस्थांची सल्ला-सेवा सुविधा व अन्य उपक्रम या निर्यातवाढीस महाराष्ट्रात पुरक ठरले आहेत.

रूपयाचे अवमूल्यन, जागतिक बाजारपेठेतील मंदी, खुल्या अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होणारी तीव्र स्पर्धा, अन्य देशांच्य आयात - निर्यात धोरणांमध्ये होणारे बदल, गॅट करार तसेच आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषदांमधील आयात - निर्यात धोरणांमधील बदल आदी क्षेत्रांचे होणारे संभाव्य चांगले - वाईट परिणाम हे या उद्योग वाढ - विकासाला पूरक - मारक ठरत असतातच याचा ही विचार उद्योजकाने प्रत्येक परिस्थितीमध्ये करणे आवश्यक आहे.

आपल्या देशातील एकूण निर्यातीमध्ये लघुउद्योगांचा ३६.२ टक्के एवढ्या सहभागाचा विचार करता अन्य मोठ्या उद्योगांच्या तुलनेत लघुउद्योगांना अधिकाधिक प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखात उल्लेख केलेल्या निर्यातक्षम विकसित उद्योग क्षेत्रांची माहिती स्वतंत्रपणे यापुढील लेखांमध्ये घेऊ ज्यामुळे अशा क्षेत्रातील उद्योग निवडीसाठीची आवश्यक माहिती उद्योजकांना मिळू शकेल.

आलेख क्र. १




आलेख क्र. २




एकूण निर्यातीमधील लघुउद्योगांचा सहभाग